# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १६.०२.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. १५/०२/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २९८ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,४६,३००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. १५/०२/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०८ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ७०.०६ लिटर दारू असा एकुण २८,३३०/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. १५/०२/२०२३ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०२ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण २,८३०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**खुनाचा प्रयत्न करणा—या विरूध्द अपराध दाखल :—**

दिनांक १५/०२/२०२३ रोजी पोस्टे बासंबा येथे कलम 302,34 भादवी मध्ये कलमवाढ ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**दुखापत दाखल गुन्हे:—**

दि. १५/०२/२०२३ रोजी पोस्टे गोरेगाव ०१ व हिंगोली ०३ असे एकुण ०४ गुन्हे कलम ३२४,३२३, ५०६,४२७,३४ भादवी व इतर कलमान्वये दाखल असुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.